# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

विद्यार्थी विकास मंडळ

# परिपत्रक

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'वंदे मातरम्' हे गीत दि. ०७ नोव्हेंबर १८७५ रोजी लिहिले. स्वातंत्र्य चळवळीत 'वंदे मातरम्' कोट्यवधी भारतीयांचा युध्दघोष बनले. या गीताचे स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक महत्व लक्षात घेता राष्ट्र गीताप्रमाणेच त्यालाही राष्ट्रीय गीत म्हणून दर्जा आहे. या घटनेला १५० वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने दि. **७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे सामूहिक गायन होणार आहे.** हा कार्यक्रम महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत येथे संपन्न होणार आहे. यानंतर सकाळी ११.१५ वाजता मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांचे 'राष्ट्रीय गीत वंदे मातरम्' या विषयावर व्याख्यान संपन्न होणार आहे.

उपरोक्त कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे.

**विद्यापीठ प्रांगण** *
**छत्रपती संभाजीनगर** *
**संदर्भ क्र. संविवि/२०२५/** 25447-25532 *
**दि. ०६ नोव्हेंबर २०२५** *

कुलसचिव

**माहितीस्तव प्रत :**

१) स्वीय सहाय्यक, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) स्वीय सहाय्यक, प्र-कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.